# आदिवासी महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण

**पौड :** इंदिरानगर कातकरी वस्ती, पौड येथील कातकरी समाजातील आदिवासी वस्तीतील महिलांची रोजगाराअभावी होणारी गैरसोय टाळण्यासाठी पुण्यातील बाणेर रोटरी क्लब व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन वर्षांपासून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बाणेर रोटरी क्लबने या वस्तीतील महिलांना रद्दी कागदापासून विविध आकारांच्या पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. यात १२ महिलांनी सहभाग घेतला.

◆ कागदी पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण विशाखा विचारे यांनी दिले. बाणेर रोटरी क्लबचे अध्यक्ष उन्मेष रिसबूड, सदस्य शशिकांत ठाकूर, पौड बचत गटाच्या प्रेरिका सुरेखा कडू, सविता तोंडे, रुपाली राऊत व कातकरी वस्तीवरील महिला, नितीन घोडके या वेळी उपस्थित होते. हे प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी सचिन आकरे यांनी विशेष प्रयत्न केले.

पिशव्याची विक्री करण्यास बाणेर रोटरी क्लब मदत करणार असल्याची माहिती क्लबचे कार्यकर्ते नितीन घोडके यांनी दिली. या प्रशिक्षणामुळे येथील महिलांना रोजगार मिळण्याबरोबरच प्लॅस्टिकच्या वापरामुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठीही मदत होणार असल्याचे घोडके यांनी सांगितले. क्विक हिलच्या पुढाकाराने पौड येथे दिशा नावाने एक कातकरी विकसन केंद्र सुरु झाले आहे. यात महिला, मुले, युवक यांच्या सर्वांगीण विकासासाठी नियमित विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये, एकल विद्यालय, कुपोषित मुले व महिलांसाठी पोषण आहार, दर आठवड्याला आरोग्य तपासणी व औषधोपचारांची सोय, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वस्तीलगतच्या रिकाम्या जागेत फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. ही वस्ती इतरांसाठी रोल मोडेल करण्याचे क्विक हिलचे स्वप्न असल्याची माहिती या वेळी अजय शिर्के यांनी यावेळी दिली.